**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक : 25.03.2024** **सोमवार**

---

**ठळक बातम्या**

1. **लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय घडामोडींना वेग.**
2. **कांदा निर्यातबंदीला पुढील आदेशापर्यंत वाढ.**
3. **राज्यात सर्वत्र होळीचा उत्साह; पारंपरिक होलिका दहनाबरोबरच अभिनव उपक्रमांचंही आयोजन.**

**आणि**

4. **जागतिक कबड्डी दिनानिमित्त एका सामन्यात सर्वाधिक खेळाडूंच्या सहभागाचा विश्वविक्रम.**

**निवडणूक**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांचे प्रमुख नेते सध्या बैठका आणि चर्चांमध्ये व्यग्र आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीचं राज्यातलं जागावाटप अजूनही अधिकृतपणे जाहीर झालेलं नसलं तरी काही पक्ष आपापले उमेदवार जाहीर करत आहेत. लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीनं १११ उमेदवारांची पाचवी यादी काल जाहीर केली. यात महाराष्ट्रातल्या तीन उमेदवारांचा समावेश आहे. भंडारा गोंदिया मतदारसंघासाठी सुनील मेंढे, गडचिरोली चिमूरसाठी अशोक नेते आणि सोलापूरसाठी राम सातपुते यांच्या नावाची घोषणा भाजपानं केली आहे. काँग्रेसनं काल जाहीर केलेल्या उमेदवारांच्या यादीत चंद्रपूर लोकसभा मतदारसंघासाठी प्रतिभा धानोरकर यांच्या नावाची घोषणा केली आहे. दरम्यान कॉंग्रेसचे नेते, खासदार आणि उद्योजक नवीन जिंदाल यांनी काल कॉंग्रेस पक्षाचा राजीनामा देऊन भाजपामध्ये प्रवेश केला आहे. नवी दिल्लीत पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत जिंदाल यांचा पक्ष प्रवेश झाला.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या प्रचार समिती स्थापन करण्याच्या प्रस्तावाला काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी मंजुरी दिली आहे. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण या प्रचार समितीचे अध्यक्ष असून नाना पटोले, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, सुशिलकुमार शिंदे, मुकूल वासनिक यांच्यासह साठ सदस्यांचा यात समावेश आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शासकीय निवसस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांची काल बैठक झाली.

यावेळी प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ उपस्थित होते. अजित पवार आणि केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्यात दिल्लीत झालेल्या चर्चेची माहिती यावेळी पक्षाच्या नेत्यांना देण्यात आली. दरम्यान शिवसेनेचे नेते आणि माजी मंत्री विजय शिवतारे यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असून, येत्या १२ एप्रिलला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचं काल जाहीर केलं. राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनी आपण महायुतीबरोबर राहाणार असल्याचं स्पष्ट केलं आहे. जानकर यांनी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या बैठकीत जानकर यांच्या पक्षाला लोकसभेची एक जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला. महायुतीचा प्रत्येक उमेदवार निवडून आणण्यासाठी आपण पूर्ण शक्तिनिशी सोबत राहू, असं जानकर यांनी यावेळी सांगितलं. नागपूर ग्रामीण उमरेड विधानसभा मतदार संघातले काँग्रेसचे विद्यमान आमदार राजू पारवे यांनी आपल्या पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा विधानसभा अध्यक्षांकडे सादर केला आहे. पारवे यांनी काल शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश केला.

**कांदा**

केंद्र सरकारनं कांदा निर्यातीवरील बंदी पुढील आदेशापर्यंत वाढवली आहे. देशात कांद्याची उपलब्धता वाढावी आणि दर नियंत्रणात राहावेत यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रानं आधी येत्या ३१ मार्चपर्यंत कांदा निर्यातीवर बंदी घातली होती; आता पुढील आदेशापर्यंत ही बंदी वाढवण्यात आली आहे. दरम्यान काही मित्र राष्ट्रांना कांदा निर्यात करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

**या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.**

**VC होळी**

दुर्गुणांचं, दुष्ट प्रवृत्तींचं दहन करुन चांगल्या विचारांचा अंगिकार करण्याचा संदेश देणाऱ्या होळी पौर्णिमेचा म्हणजेच शिमग्याचा काल राज्यात सर्वत्र उत्साह दिसून आला. पारंपरिक पद्धतीनं होलिका दहन करतानाच काही ठिकाणी अभिनव उपक्रम राबवत होलिकोत्सव साजरा करण्यात आला. राज्यातल्या विविध भागात साजऱ्या झालेल्या होलिकोत्सवाबाबत अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून.

*भटक्यांची पंढरी म्हणून ओळख असलेल्या नाथ सांप्रदायातील कानिफनाथांच्या यात्रेला कालपासून अहमदनगर जिल्ह्यातल्या मढी इथं प्रारंभ झाला. चैतन्य कानिफनाथांचा जयघोष आणि डफ, ढोल, ताशा, झांज अशा पारंपरिक वाद्यांच्या गजरात भाविक तल्लीन झाले होते. मानाच्या काठीची ग्राम प्रदक्षिणा झाल्यानंतर मिरवणूक काढण्यात आली. हा यात्रोत्सव गुढीपाडव्यापर्यंत चालणार आहे. वाशीममध्ये संकल्प फाउंडेशन गेल्या १७ वर्षांपासून स्मशान होलीकोत्सव साजरा करत आहे. यंदाही*

*या अभिनव उपक्रमाद्वारे स्मशानाची स्वच्छता करून परिसरातील प्लास्टिक, गुटखा आदींचा कचरा गोळा करून त्याची होळी करण्यात आली. तरुण पिढीला व्यसनापासून दूर राहण्याचा संदेश देण्याच्या उद्देशानं हा उपक्रम राबवला जातो. हिंगोली जिल्ह्यातील आखाडा बाळापूर इथल्या विद्यार्थ्यांनी होळीत षडविकारांची होळी करण्याचा संदेश दिला तर एका युवक मंडळाने कचऱ्याची होळी पेटवून कचरा मुक्तीचा संकल्प केला. धुळ्यात काल सर्वपक्षीय नेते मंडळींनी एकत्र येत होळी आणि रंगोत्सव साजरा केला. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकमेकांवर आरोप प्रत्यारोपाची उधळण करणारे राजकीय नेते होळीच्या निमित्ताने कटुता विसरून एकमेकांवर रंग उधळत हास्यविनोदात रमल्याचं दिसून आलं. बुलडाणा जिल्हातील सैलानी बाबा यात्रा महोत्सवाला काल सुरुवात झाली. अब्दुल रहेमान उर्फ सैलानी बाबा यांच्या दर्ग्यावर चादर चढवल्यानंतर नारळाच्या होळीची विधिवत पूजा करून होळी पेटवण्याची प्रथा या ठिकाणी अनेक वर्षापासून जपली जाते. कोकणात तर शिमग्याचा हा उत्साह महिनाभर आधीचं सुरू झाला होता. कोकणाबाहेरचे चाकरमानी शिमगोत्सवासाठी आपापल्या गावात दाखल झाले होते. ढोल ताशांचा गजर, ग्रामदैवतांच्या सजलेल्या पालख्या, संकासूर, नमन खेळ्यासारख्या लोककला असं अत्यंत उत्साहाचं वातावरण कोकणातल्या बहुतांश गावात होतं. पुण्यातही काल ठिकठिकाणी होलिका दहन करण्यात आलं. होळी पौर्णिमेनिमित्त श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीला दोन हजार किलो द्राक्षांची आरास करण्यात आली होती. नाशिकच्या सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनीनं ही आरास केली होती. ही द्राक्षे भाविकांबरोबरच ससून रूग्णालय, वृद्धाश्रम, आणि अनाथाश्रमत वाटण्यात आली. कालच्या होळी पौर्णिमेनंतर आज ठिकठिकाणी रंगांचा उत्सव असलेला धुलीवंदनाचा सण साजरा होत आहे.*

*आकाशवाणी बातम्यासाठी आमच्या ठिकठीकाणच्या बातमीदारांसह विजयालक्ष्मी साळवी पुणे.*

**पाल्म संडे**

ख्रिस्ती बांधवाच्या पवित्र आठवड्याला कालपासून सुरुवात झाली. झावळ्यांचा रविवार म्हणजेच पाम संडे काल सर्वत्र साजरा करण्यात आला. ईस्टर संडे आणि गुड फ्रायडेच्या आधी येणारा रविवार हा पाम संडे म्हणून साजरा केला जातो. वाशिम शहरातल्या ख्रिस्ती बांधवांनी हातात नारळाच्या झावळ्या घेऊन शांतता फेरी काढली. ख्रिस्ती समाजात चाळीस दिवसांच्या उपवासाला विशेष महत्त्व असते. पाम संडे ते ईस्टर संडेपर्यंतच्या पवित्र सप्ताहानिमित्त चर्चमध्ये विशेष प्रार्थनेचे आयोजन करण्यात आलं आहे.

**पट्ठेबापूराव**

सांगलीमध्ये सांस्कृतिक कार्य संचालनालयानं शाहीर पट्ठे बापूराव यांच्या जयंतीनिमित्त काल विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. पट्ठे बापूराव यांच्या तमाशातील गण, गवळण, लावण्या, छक्कड आणि वगनाट्य यांचं सादरीकरण यावेळी करण्यात आलं होतं.

### बंग पुरस्कार

नांदेड इथल्या प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानच्या वतीनं डॉक्टर अभय बंग यांना काल मातोश्री पद्मिनीबाई बन साधना सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रसाद बन महाराज होटाळेकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचं वितरणही यावेळी झालं. डॉक्टर अनुराग लव्हेकर, स्टॅन्ली गोन्सालविस, आणि मंगला असोलेकर देशपांडे यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

## जागतिक कबड्डी दिन

जागतिक कबड्डी दिनानिमित्त काल भारतानं एका सामन्यात सर्वाधिक खेळाडूंच्या सहभागाची विक्रमी नोंद केली. वर्ल्ड कबड्डी आणि होलिस्टीक इंटरनॅशनल प्रवासी स्पोर्टस असोसिएशन अर्थात हिपसा या संस्थांनी हा सामना हरियाणातील पंचकुला इथं आयोजित केला होता. नुकताच हिपसा आणि हरियाणा राज्य सरकार यांच्यात कबड्डीला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून देण्याबाबतचा सामंजस्य करार झाला होता. कबड्डीच्या प्रदर्शनीय सामन्यात सर्वाधिक ८४ खेळाडूंच्या सहभागाच्या विक्रमाला मागे टाकत तीन तास चाललेल्या या सामन्यात १२८ खेळाडूंनी भाग घेतला. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस च्या पथकाकडून हरियाणाचे राज्यपाल बंडारू दत्तात्रय यांनी या विक्रमाच्या नोंदीचं प्रमाणपत्र स्वीकारलं.

### हवामान

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**